# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
(०२०) २५६२ ११९०
२५६२ ११९१
२५६२ ११९२
२५६२ ११९३

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे — ४११ ००७
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
ई—मेल:affiliation@pun.unipune.ac.in
affiliation@unipune.ac.in


**संदर्भ क्र.: सीए/** 1451 **दिनांक :** 13/08/2024

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
मा.अध्यक्ष/सचिव
संबंधित संस्था,

**विषय — उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, निर्णय क्र. मान्यता—२०२४/प्र.क्र २४५/ ताशि—४. दिनांक ०७ ऑगस्ट, २०२४ नुसार मान्यता देण्यात आलेलया नवीन परिसंस्था व अभ्यासक्रमांबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयांकित शासन निर्णयानुसार, अनेक नवीन संस्थांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या तसेच शासनाच्या निर्णयानुसार अंतिम मान्यता देण्यात आलेली आहे. याबाबत काही संस्थांनी विहित नमुन्यामध्ये आणि विहित कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठाकडे संलग्नीकरणासाठी कोणताही प्रस्ताव/पत्रव्यवहार केल्याचे दिसून येत नाही.

सबब, विषयांकित शासन निर्णयामध्ये त्यांच्या नावाव्यतिरिक्त इतर कोणतीही माहिती विद्यापीठाच्या संलग्नता विभागाकडे उपलब्ध नसल्याने संलग्नीकरणाची विहित प्रक्रिया करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे संबंधित संस्थांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्नता विभागामध्ये त्वरीत संपर्क साधावा. अन्यथा अशा संस्थेस शै. वर्ष २०२४—२५ करिता संलग्नीकरणाचे पत्र देता येणार नाही.

संबंधित संस्थांनी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात माहिती सादर करावी, वेळेत संपर्क न केल्यास याची सर्व जबाबदारी संबंधित संस्थेची राहीन.

त्याचप्रमाणे, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११०(५) मधील तरतूदीनुसार विद्यापीठाकडून उच्च शिक्षणाचे महाविद्यालय किंवा परिसंस्था किंवा नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा वा अतिरिक्त तुकडी यांच्या संलग्नीकरणांस मंजूरी देण्यात आल्याशिवाय कोणत्याही विद्यार्थ्याला महाविद्यालयात किंवा परिसंस्थेत प्रवेश देता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

(गिरीश भेत)
उपकुलसचिव, संलग्नता कक्ष

सोबत — विहित नमुना.

| संस्थेची माहिती | |
|---|---|
| संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता<br>मोबाईल क्रमांकासह | |
| ई — मेल | |
| संस्था/सोसायटी/ट्रस्ट नोंदणी क्र. | |
| नवीन परिसंस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | |
| तातडीच्या संपर्कासाठी संस्थेने निर्देशित केलेल्या<br>व्यक्तीचे नाव मोबाईल क्र. व ई—मेल. | |

*********